जावक क्रमांक ९९८९ /२०१८
हडपसर पोलीस स्टेशन,पुणे
दिनांक – १० /०८/२०१८

प्रती,

मा. जनसंपर्क अधिकारी सो

पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

प्रतिवेदक – एच. बी. खोपडे, सहा. पोलीस निरीक्षक, हडपसर पो स्टे पुणे.

यांज कडून विनंती पूर्वक की,

विषय – बेवारस मयत पुरूषाचे नातेवाईकाचा तपास होणेकामी वर्तमान पत्रात प्रसिध्दी होणेबाबत......

२/- हडपसर पो. स्टे. अ.मयत रजिस्टर नंबर- २०२/२०१८ सी.आर.पी.सी. १७४ मधील बेवारस पुरूष वय अंदाजे ३० वर्षे हा दि. ०९/०८/२०१८ रोजी सकाळी ०९.०० चे सुमारास गंधर्व हॉटेलच्या मागे, काळे पडळ रेल्वे ट्रकच्या बाजुला रेल्वेची धडक बसल्याने एक अनोळखी इसम हा जखमी होवून त्याचे डोळे बंद, तोंड अर्धवट उघडे, डोक्याच्या मागील बाजुस जखम होवुन कवटी तुटून मेंदु दिसत आहे. तसेच नाकातुन रक्त आलेले व उजव्या हाताची दोन बोटे तुटून वेगळे झालेले व आतील मांस व हाडे दिसत आहे. जखमी इसम आश्या अवस्थेत मिळुन आल्याने त्यास उपचार कामी ससुन हास्पीटल पुणे येथे दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला एम.एल.सी.नं. १८११४/२०१८ अन्वये ॲडमिट केले असता तो डॉक्टर तपासणीपुर्वी मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. त्यांचे एम. एल. पी. एम. नंबर ३९३२/२०१८ अन्वये पोस्ट मार्टेम झाले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे-

एक अनोळखी इसम **वय**- अंदाजे ३० वर्षे, नाव व पत्ता माहीत नाही, **रंगाने**-गोरा, **केस**- काळे मागे वळवलेले **बांधा**- मजबुत,**उंची**- अंदाजे ५ फुट,५ इंच **कान**- मोठे, **नाक**- सरळ, **दाढी**- हनवटीवर बारीक वाढलेली काळी, **मिशी**- काळी ओठावर पसरट, **ओठ**- जाड, **चेहरा**- उभट **अंगात**- निळ्या रंगाचा शर्ट त्याला पांढरे टिपके व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट जवळ पैसा अडका अगर मौल्यवान वस्तु नाही अथवा कोणत्याही प्रकारचा पेपर नाही.

येणे प्रमाणे वरील वर्णनाचा अनोळखी इसम वर नमूद केले तारखेस वेळी व ठिकाणी रेल्वे अपघात होवुन जखमी स्थितीत मिळून आलेने त्याचे वारसाचा तपास होणेकामी सर्व वर्तमान पत्रात प्रसिध्दी होणेस विनंती आहे.